करोना/2020/सूचना/आदेश क्र. 164

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. 31/03/2020

प्रति,
तहसिलदार सर्व

विषय:- **करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना.**
पशुसंवर्धन विभागातील अत्यावश्यक सेवेतील पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना कर्तव्यावर जाण्यास संचारबंदी मधून सूट मिळणेबाबत

संदर्भ:-1) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड अलिबाग यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. जिपउ/तांत्रिक/covid-19/796/2020 दि. 30/03/2020

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणू (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13/03/2020 पासून लागू करुन सदर कायद्यामधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्या अनुंषगाने करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हयामध्ये वाहतूक बंदी व संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. कोरोना विषाणू (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा 1897 मधील सुधारीत संचारबंदी आदेश दि. 25/03/2020 मधील मार्गदर्शक सूचंनाप्रमाणे (6)(p) अन्वये पशुवैद्यकीय दवाखाने, पशुआरोग्य केंद्र व पाळीव प्राण्यांची खाद्य दुकाने यांना संचारबंदीच्या अध्यादेशान्वये सूट देण्यात आलेली आहे. तसेच मा. संयुक्त सचिव भारत सरकार, मत्सपालन, पशुपालन एवं डेअरी मंत्रालय पशुपालन एवं डेअरी विभाग कृषीभवन नवी दिल्ली यांचे दि. 23/03/2020 चे अर्धशासकीय पत्रान्वये पशुवैद्यकीय सेवा ही अत्यावश्यक बाबीखाली समावेश करण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रकान्वये पशुवैद्यकीय दवाखान्याचे दैनदिन कामकाज सुरु ठेवण्यासाठी अत्यावश्यक सेवा बजावताना रायगड जिल्हयातील 122 पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/कर्मचारी यांना सेवा बजावताना पोलीस यंत्रणेमार्फत विचारणा होत आहे तसेच गैरसमजुतीमुळे मारहाण होण्याची संभवना वाटते.

पशुवैद्यकीय सेवा अत्यावश्यक असल्याने संचारबंदीतून सूट दिलेली आहे त्यामुळे मा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी निर्देशित केलेल्या संचारबंदी पास नमुन्यामध्ये प्रमाणित करण्यात आलेल्या सर्व सहाय्यक आयुक्त (गट-अ) पशुधन विकास अधिकारी (गट अ/ब) सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचार व परिचर यांना आपले स्तरावरुन पास निर्गमीत करण्यात यावेत.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी RAIGAD-ALIBAG

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
रायगड - अलिबाग

प्रत : प्रत : मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांसकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत : पोलीस अधिक्षक रायगड अलिबाग यांसकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत : उपविभागीय अधिकारी सर्व
प्रत : जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड-अलिबाग

2/- संबंधित तहसिलदार यांच्याशी संपर्क साधून पास प्राप्त करुन घेणेबाबत कार्यवाही करावी.